## जनसंपर्क विभाग

### बातमी क्र.1

जळगाव, दि. २६ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अत्याधुनिक प्रयोगशाळा उपकरणे हाताळण्याबाबत एक आठवडयाचा अभ्यास वर्ग आयोजित करण्यात आला असुन सोमवार दि. २६ ऑगस्ट रोजी या अभ्यास वर्गाचे उद्‌घाटन कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते झाले.

महाराष्ट्रातील ४० प्राध्यापक या अभ्यास वर्गात सहभागी झाले आहेत. यावेळी बोलतांना कुलगुरु प्रा.माहेश्वरी यांनी या अभ्यासवर्गामुळे नियतकालिकामध्ये संशोधन प्रकाशित करण्यासाठी निश्चित मदत होईल. अशी अपेक्षा व्यक्त केली. समन्वयक प्रा.भुषण चौधरी यांनी आंतरविद्याशाखीय संशोधनाविषयी माहिती दिली. राज्य अध्यापक विकास संस्थेचे गणेश भिसे यांनी संस्थेची माहिती दिली. प्र.कुलगुरु एस.टी.इंगळे यांनी विद्यापीठाची माहिती व सुविधा याबद्दल सविस्तर पणे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. व्ही.एम. रोकडे यांनी केले. शनिवार दि. ३१ ऑगस्ट पर्यंत हा अभ्यासवर्ग सुरु असुन दररोज विविध प्रशाळांमध्ये उपकरणे हाताळण्याबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

---

प्रती,
मा.संपादक/प्रतिनिधी,
कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

( डॉ. सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी